**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक ९ मार्च, २०२१

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४८ ते ५६ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री** : विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) कामगार मंत्री** : **(क)** सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, सांगली यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांचा सन २०१५-२०१६ ते २०१७-२०१८ या वर्षांचा अनुक्रमे चौदावा, पंधरावा व सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अहमदनगर यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** कापूस बाजार कामगार मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे यांचे सन २०११-२०१२ ते २०१८-२०१९ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा ते सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचे सन २०१३-२०१४ ते २०१७-२०१८ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा ते चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ. यांचे सन २०१३-२०१४ ते २०१७-२०१८ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई यांचे सन २०१०-२०११ ते २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा ते पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** सांगली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, यांचे सन १९९५-१९९६ ते २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे बारावा ते एकोणतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

, **(ट)** मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचे सन २००७-२००८ ते २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे अडतिसावा ते एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** महाराष्ट्र मच्छीमार उद्योगातील मच्छीमार व इतर कामगार मंडळ यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा पहिला वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) गृह मंत्री** : महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा चव्वेचाळीसावा व दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(५) ग्रामविकास मंत्री** : **(क)** सन २०१७-२०१८ चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / पालघर / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ /नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये ग्रामविकास विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(६) शालेय शिक्षण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय

व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(७) नगरविकास मंत्री** : सन २०२० च्या चौथ्या अधिवेशनात दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ४८ मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० यावरील चर्चेदरम्यान श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांच्या मागणीच्या अनुषंगाने मा. उप मुख्यमंत्री महोदयांनी "५० कोटी रुपयांपुढील झालेले सर्व व्यवहार" याबाबत सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**(८) वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री** :

**(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सन २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(९) आदिवासी विकास मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये आदिवासी विकास विभागाचे सन २०१९-

२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(१०) **महिला व बाल विकास मंत्री** : **(क)** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये महिला व बाल विकास विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(११) **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(सोमवार, दिनांक ८ मार्च, २०२१ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

तीन : **सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड.आशिष शेलार, डॉ.संजय कुटे, सर्वश्री रवि राणा, संभाजी पाटील-निलंगेकर, अतुल भातखळकर, राम कदम, गणेश नाईक, नितेश राणे, जयकुमार रावल, गिरीष महाजन, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री समीर कुणावार, बबनराव लोणीकर, सुनील राणे, हरीभाऊ बागडे, अभिमन्यु पवार, सचिन कल्याणशेट्टी, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड‍ पराग अळवणी, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, रणधीर सावरकर, मोहन मते, संतोष दानवे, प्रशांत बंब, अमित साटम, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड‍ राहुल कुल, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पुणे येथे पुजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संशयित मंत्र्यांचा राजीनामा घेतला असला तरी तो तीन दिवसांनंतरही राज्यपालांकडे पाठविलेला नसल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, या प्रकरणी २४ दिवसांचा कालावधी होऊनही गुन्हा दाखल झालेला नसून तपासाबाबत राज्यातील जनतेला अंधारात ठेवले असणे, पारदर्शक पध्दतीने तपास होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेकडे तपास देण्याची आवश्यकता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, पोलिसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक या सारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफियांकडून, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून, शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले व जीवे मारण्याच्या धमक्या, कोरोना काळात पोलिसांवर झालेले हल्ले, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांना मिळालेले मोकळे रान, सामाजिक अत्याचारात झालेली वाढ, महान कलाकारांची गुप्तहेरांमार्फत चौकशी करण्याचा सरकारने घेतलेला घृणास्पद निर्णय, गुंडाराजच होत असलेलं उदात्तीकरण, राज्यावर घातपाती कारवायांचे असलेले गंभीर सावट, जातीय हिंसाचारात झालेली वाढ, जातपंचायतीच्या अत्याचाराच्या समोर आलेल्या घटना, तसेच, मुंबईतील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, मुंबईतील रखडलेली विकास कामे, महानगरपालिकेने गेल्या १० वर्षात केलेला खर्च, याबाबत श्वेतपत्रिका जाहीर करण्याची होत असलेली मागणी, मुंबईतील मेट्रोची कारशेड कांजूरमार्गलाच करण्याबाबत सरकारने धरलेला दुराग्रह त्यातून मेट्रोला होणारा विलंब व मुंबईकरांचे होणारे नुकसान, कोस्टल रोडच्या कामामुळे मच्छीमारांचे निर्माण झालेले प्रश्न, धारावी पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यात होत असलेला विलंब, उपकर प्राप्त इमारतींचा प्रश्न, देवनार डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासातील समस्या यासारख्या मुंबईच्या समस्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन, सेस इमारतींचा प्रश्न, पुनर्बांधणी, स्वयंपुनर्बांधणी, परवडणारी घरे, भाडयाची घरे, महाकाय प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्यांच्या समस्या, मास हाऊसिंग सारखे प्रश्न व त्याबाबतच्या उपाययोजनांमध्ये निर्माण झालेल्या समस्या, तसेच कोरोना प्रादुर्भाव व मृत्यूची संख्या देशपातळीवर महाराष्ट्रात सर्वाधिक, कोरोना उपाययोजनात झालेला भ्रष्टाचार, टाळेबंदीमुळे अडचणीत आलेल्यांना सरकारने पॅकेजेस देण्यात केलेली कुचराई, सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांकडून कोरोना नियमांचे झालेले उल्लंघन, कोरोना हाताळण्यात सरकारला आलेले अपयश, तसेच राज्यातील विविध विभागांचा संतुलित विकास करण्यात व टाळेबंदी शिथिलीकरणानंतर या विभागांचे अर्थचक्र सुरळीत करण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित

जमाती, इतर मागास वर्ग, मराठा, धनगर, आर्थिकदृष्टया मागास यांच्यासाठीच्या योजना राबवण्यात, त्याचा लाभ देण्यात सरकारला आलेले अपयश, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**चार : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २४६ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**पाच : सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला व शेवटचा दिवस)**

**सहा : शासकीय विधेयक :**

**विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, ॲड राहुल कुल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सात : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड आशिष शेलार, सर्वश्री गिरीष महाजन, हरिभाऊ बागडे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, संभाजी पाटील-निलंगेकर, नितेश राणे, अतुल भातखळकर,**

**श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, कालिदास कोळंबकर, योगेश सागर, सुभाष देशमुख, मंगलप्रभात लोढा, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री राम कदम, सुनिल राणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, देवयानी फरांदे, मनिषा चौधरी, सर्वश्री रणधीर सावरकर, राणाजगजितसिंग पाटील, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री समीर कुणावार, मोहन मते, डॉ. देवराव होळी, श्री समीर मेघे, डॉ. भारती लव्हेकर, श्री अमित साटम, सर्वश्रीमती सीमा हिरे, मोनिका राजळे, नमिता मुंदडा, श्री. राम सातपुते, श्रीमती विद्या ठाकूर, ॲड पराग अळवणी, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, महेश लांडगे, लक्ष्मण जगताप, सुनिल कांबळे, अभिमन्यू पवार, सचिन कल्याण-शेट्टी, जयकुमार गोरे, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, ॲड आकाश फुंडकर, सर्वश्री हरिष पिंपळे, दादाराव केचे, टेकचंद सावरकर, प्रा.डॉ. अशोक उईके, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, मदन येरावार, नारायण कुचे, प्रशांत बंब, कॅप्ट. आर. तमिल सेल्वन, ॲड राहुल कुल, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, नामदेव ससाणे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी रुपये २५,००० व बागायती पिकांसाठी हेक्टरी रुपये ५०,००० मदत देण्याच्या घोषणा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिल्यानंतर प्रत्यक्षात मात्र महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांचा पूर्णपणे भ्रमनिरास केलेला असणे, महात्मा फुले कर्जमाफी योजनेमध्ये देण्यात आलेल्या कर्जमाफीपासून राज्यातील अनेक पात्र शेतकरी अद्यापही वंचित असणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याची सरकारची घोषणा हवेतच विरलेली असणे, कोरोना संकटाचा फटका समाजातील अन्य घटकांबरोबरच शेतकऱ्यांनाही बसलेला असणे, अशातच अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले असणे, माहे फेब्रुवारी ते मे, २०२० या कालावधीतील गारपीटीसाठी दिलेली नुकसान भरपाई अत्यंत विलंबाने व तुटपुंजी असणे, शेतकऱ्यांचा मागील वर्षाचा खरीप हंगाम ऐन भरात असताना अतिवृष्टी व त्यानंतर मावा, तुडतुडा या रोगांनी पिकावर आक्रमण केलेले असणे, बोंडअळी व बोंडसडीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आत्यंतिक नुकसान झालेले असणे, याची कोणतीच नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अद्यापही मिळालेली नसणे, शेतमालाला भाव मिळत नसणे, कापूस, तूर खरेदी केंद्रे सुरू करण्यात होत असलेला विलंब, पीक कर्जे देण्यास बँका टाळाटाळ करत असणे, प्रथम बोगस बियाणांमुळे करावी लागलेली दुबार पेरणी नंतर अतिवृष्टी व पिकांवर पडलेले रोग यामुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगाम हातचा जाणे, ज्याअर्थी, खरिपाची ही तूट रब्बी हंगामात भरून काढण्याच्या बेतात शेतकरी असणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहू, हरभरा, तूर, वाटाणा, ज्वारी, लाखोरी, जवस यासारख्या कडधान्ययुक्त पिकांची लागवड केली असणे, त्याशिवाय फळपिके व भाजीपाला पिकांचीही लागवड केली असणे, मात्र अचानक वातावरणात बदल घडून येऊन अवकाळी पाऊस झाल्याने ही पिके धोक्यात आली असणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ पासून तीन ते चार दिवस राज्यात अवकाळी पाऊस बरसलेला

असणे, मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्याच्या अनेक भागात सलग दोन दिवस गारपिटीसह पाऊस बरसलेला असणे, मध्य व पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे या जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसासह गारांचा पाऊस पडणे, विदर्भातील नागपूर, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यातही अवकाळी पावसाने चांगलीच हजेरी लावणे, कोकणातही पावसाच्या सरी पडणे, या पावसामुळे शेतकऱ्यांच्या गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असणे, अनेक ठिकाणी पावसामुळे पिके आडवी पडल्याचे दिसून येत असणे, आंब्याचा मोहरही गळून पडलेला असणे, द्राक्षे, टरबूज, खरबूज या पिकांचेही नुकसान झालेले असणे, मागील वर्षी झालेल्या नुकसानभरपाईचे पैसे अद्यापही हाती येण्यास अवकाश असणे, अशा परिस्थितीत पुन्हा उद्‌भवलेल्या या अस्मानी संकटामुळे शेतकरी पुरता हवालदिल झालेला असणे, नुकसान भरपाईचे पंचनामे तातडीने करण्याबाबत शेतकऱ्यांकडून मागणी होत असणे, किमान यावेळी तरी शेतकऱ्याला प्रति हेक्टर त्वरित भरीव अर्थसहाय्य करण्याची गरज असणे, राज्यातील शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्याची व भरीव आर्थिक मदतीचा हात सरकारने पुढे करण्याची आवश्यकता, तसेच महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर ३०० युनिटपर्यंत मोफत विजेची घोषणा केली असली तरी त्याची अंमलबजावणी केलेली नसणे, कोरोना काळात आलेल्या वाढीव बिलात सवलत देण्याची घोषणा ऊर्जामंत्र्यांनी केलेली असणे, परंतु, त्याची अंमलबजावणी झालेली नसणे, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या कृषि पंपांना मोफत वीज, थकबाकी माफ करणे, अशा मागण्या सरकारकडे वारंवार केल्या गेल्या असल्या तरी सरकारने त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले असणे, शेती पंपांसाठी पैसे भरुनही लाखो शेतकऱ्यांना विद्युत जोडणी मिळालेली नसणे, मागील काळात अचानकपणे वीज खंडित झाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र ठप्प झाला असणे, यामुळे कोट्यवधीचे नुकसान झालेले असणे, यामागे घातपाती कारवाई असावी असा संशय व्यक्त केला जाणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याबाबत आश्वासन सरकारने दिले असले तरी त्याबाबत कोणतीही उपाययोजना सरकारने केलेली नसणे, सोलर एनर्जी व विंड एनर्जी बाबत राज्याचे धोरण असले तरी या धोरणाची अंमलबजावणी झालेली नसणे, राज्यातील वीज क्षेत्रातील विविध प्रश्न, राज्य सरकारने याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता विचारात घेण्यात यावी."

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : ८ मार्च, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा